

पंढरपूर : येथे रविवारी माघी एकादशीनिमित्त मंदिर परिसरात झालेली भाविकांची गर्दी. (छायाचित्र : राजकुमार घाडगे, पंढरपूर)

# विठ्ठल विठ्ठल गजरी, अवघी दुमदुमली पंढरी

- माघी यात्रेनिमित्त तीन लाखांहून अधिक भाविक
- दर्शनासाठी लागला १६ तासांपेक्षा जास्त कालावधी

**पंढरपूर, जि. सोलापूर (प्रतिनिधी) :**

*विठ्ठल विठ्ठल गजरी ।*
*अवघी दुमदुमली पंढरी ॥*
*हरि कीर्तनाची दाटी ।*
*तेथे चोखा घाली मिठी ॥*

श्री विठ्ठलाच्या दर्शनाचे समाधान आणि माघी यात्रा सोहळ्याचा आनंद मिळवण्यासाठी सुमारे तीन लाखांहून अधिक भाविक येथे आले आहेत. यात्राकाळात २६ जानेवारी, शनिवार आणि रविवार जोडून आल्याने दरवर्षीच्या तुलनेत यंदा भाविकांच्या गर्दीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आज (रविवारी) माघी एकादशी दिवशी सोळा तास लागत होते.

दरवर्षीपेक्षा यंदा अधिक गर्दी झाल्याने श्री विठ्ठलाच्या दर्शनाची रांग शनिवारी रात्री पाचव्या क्रमांकाच्या पत्राशेडमध्ये गेली होती. यंदा माघी यात्रेला जास्त गर्दी झाल्याबद्दल अशोक पांडुरंग कदम (कणकेवाडी, ता. राधानगरी, जिल्हा-कोल्हापूर) यांना विचारले असता, ते म्हणाले, आमच्या भागातील ऊसतोड यंदा लवकर संपली आहे. शेतशिवारामध्ये सध्या काही महत्त्वाची कामे नाहीत. त्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा आमच्या दिंडीत या वर्षी दुप्पट वारकरी सामील झाले आहेत.

माघी एकादशीनिमित्त चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. स्नान आटोपल्यानंतर भाविक दर्शनरांगेत तर दिंड्या नगर प्रदक्षिणेला जात होत्या. सकाळी १० वाजता श्री विठ्ठल मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर आलेल्या बाबूराव सदाशिव जाधव (रा. अमदाबाद, तालुका - भालकी, जिल्हा - बिदर) यांना विचारले असता ते म्हणाले, आम्ही काल सायंकाळी ६ वाजता दर्शन बारीमध्ये उभे होतो. दर्शन रांगेतील भाविकांना मंदिर समितीच्या वतीने चहा-पाणी देण्यात आले. मात्र रांग पुढे सरकण्याचा वेग कमी असल्यामुळे दर्शनासाठी जवळपास १६ तास लागले.

### अतिक्रमणे जैसे थे.....

दरवर्षी यात्रेत स्थानिक नागरिकांच्या दुकानांच्या पुढील रस्त्यावर हे विक्रेते त्यांचे स्टॉल मांडून बसतात. या वर्षीदेखील तीच परिस्थिती दिसत आहे. सर्वत्र परगावाच्या विक्रेत्यांनी स्टॉल लावल्याने वारकऱ्यांना चालणे मुश्किल होत होते.

### स्वच्छतेकडे पालिकेचे दुर्लक्ष

मंदिर परिसरात व स्टेशन रोडवर अनेक ठिकाणी कचरा साठल्याचे दिसत होते. याबाबत पुणे येथून सहकुटुंब आलेले अमित सिन्हा यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असूनही येथे सर्वत्र अस्वच्छता दिसून येत आहे. किमान मंदिर परिसर तरी कचरामुक्त ठेवायला हवा.

# राज्यात साडेपंधरा लाख माती आरोग्यपत्रिकांचे वाटप

**पुणे (प्रतिनिधी) :** राज्यातील साडेपंधरा लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत जमीन आरोग्यपत्रिकेचे वाटप करण्यात आले आहे. जमीन आरोग्यपत्रिका वाटपासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातून उपलब्ध झालेला आहे.

जमिनीतील अन्नद्रव्यांची कमतरता विचारात न घेता रासायनिक खतांच्या कमी-जास्त वापर केला गेला आहे. त्यामुळे राज्यातील शेतजमिनींचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. जमिनींच्या आरोग्य सुधारणेसाठी खतांचा संतुलित वापर करण्याचा आग्रह केंद्र शासनाचा आहे. त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याच्या हातात जमिनीची आरोग्यपत्रिका देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला.

राज्याच्या मदतीने आरोग्यपत्रिका वाटपाची मोहीम २०१५ पासून केंद्राने हाती घेतली आहे. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत राज्यात पावणेबारा लाख माती नमुने तपासण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, कृषी खात्याने चांगल्या नियोजनामुळे उद्दिष्टापेक्षा १२७ टक्के म्हणजे १५ लाख नमुने काढले आहेत. बागायती जमिनीसाठी अडीच हेक्टर क्षेत्रातून एक नमुना आणि जिरायती भागात दहा हेक्टर जमिनीतून एक नमुना गोळा करणे बंधनकारक करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना जमिनीची आरोग्यपत्रिका वाटण्यात सध्या पुणे विभाग आघाडीवर आहे.

शेतकऱ्याची भेट घेऊन माती नमुने काढण्याची जबाबदारी शासनाने कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांवर सोपविलेली आहे. मात्र, शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे कृषी विभागातील इतर कर्मचारी, विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी, माती चाचणी प्रयोगशाळेचे कर्मचारी, तसेच कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची आदी घटकांची मदत घेता येते. माती नमुना गोळा करण्यासाठी उपलब्ध घटकांची मदत घेण्याचे अधिकार संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.

### विभागनिहाय जमीन आरोग्यपत्रिका वाटप

| | |
|---|---|
| पुणे | ४.२५ लाख |
| नाशिक | २.५४ लाख |
| ठाणे | ३० हजार |
| कोल्हापूर | १.८७ लाख |
| औरंगाबाद | १.८४ लाख |
| लातूर | १.५९ लाख |
| अमरावती | ६३ हजार |
| नागपूर | ८९ हजार |

### एका आरोग्यपत्रिकेसाठी ३०० रुपये खर्च

**माती तपासणीसाठी कृषी खात्याच्या ३१ प्रयोगशाळा वापरल्या जात आहेत. याशिवाय १३७ खासगी प्रयोगशाळांचीदेखील मदत घेतली जात आहे. ''जमीन आरोग्यपत्रिका तयार करण्यासाठी एकूण १६८ प्रयोगशाळा वापरल्या जात आहेत. या प्रयोगशाळांची माती तपासणीची वार्षिक क्षमता १४ लाख ६० हजार नमुन्यांची आहे. सरकारकडून एक आरोग्यपत्रिका तयार करण्यासाठी ३०० रुपये खर्च केले जात आहेत, असे सूत्रांनी स्पष्ट केले.**

सकाळ ॲग्रोवन आयोजित
MAHAVIR STEEL INDUSTRIES LTD ...दुसरे तिसरे काही नको प्रायोजित
सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
मंगळवार, ३० जानेवारी २०१८
विषय - निर्यातक्षम डाळिंब उत्पादन
वक्ते - प्रा. प्रशांत कुंभार
(उमा महाविद्यालय, मोंडनिंब)
स्थळ - पांडुरंग महाराज मठ, मु. पो. जुनोनी, ता. सांगोला, जि. सोलापूर
वेळ - सायं. ४ वाजता
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.




